01 FEB 2025
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# गतिशीलता, स्वावलंबन हा गांधींचा चरख्यामागील विचार

## डॉ. सुनीलकुमार लवटे : विद्यापीठात महात्मा गांधींवरील दोन पुस्तकांचे प्रकाशन

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ३१ : महात्मा गांधी यांनी चरख्याच्या माध्यमातून नागरी समाजाची प्रतिष्ठापना करण्याचा प्रयत्न केला. शेतकऱ्यांच्या स्वावलंबनासाठी आणि देशाच्या विकासासाठी गांधीजींनी अनेक प्रयोग केले. गतिशीलता आणि स्वावलंबन हा चरख्यामागचा खरा विचार आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी आज येथे केले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात महात्मा गांधी सप्ताहानिमित्त आयोजित व्याख्यानात बोलताना डॉ. सुनीलकुमार लवटे. शेजारी डावीकडून डॉ. दशरथ पारेकर, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. प्रकाश पवार.

शिवाजी विद्यापीठाच्या गांधी अभ्यास केंद्राचे रौप्यमहोत्सवी वर्ष आणि महात्मा गांधीजींच्या स्मृतिदिनानिमित्त महात्मा गांधी सप्ताह साजरा करण्यात येत आहे. याअंतर्गत 'चरखा' या विषयावर डॉ. लवटे यांचे व्याख्यान झाले. डॉ. अभय बंग लिखित 'आजचे शिक्षण आणि महात्मा गांधींचे उपाय' आणि डॉ. दशरथ पारेकर अनुवादित व संपादित 'गांधी: एक माणूस' या पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

डॉ. लवटे म्हणाले, 'गांधीजींनी चरखा हे आपल्या स्वराज्याचे साधन म्हणून स्वीकारले. गांधी विचारांवर छोटे छोटे अभ्यासक्रम सुरू झाल्यास आजचा तरुण स्वावलंबी आणि उद्योजक बनेल.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'विद्यार्थ्यांनी सर्वांगीण विकास होण्यासाठी गांधी विचारांवरील पुस्तकांचे सातत्याने वाचन, चिंतन, मनन आणि चर्चा करणे आवश्यक आहे.'

सुरेश शिपूरकर, श्री. नागेशकर, ज्येष्ठ पत्रकार डॉ. श्रीराम पवार, डॉ. नंदा पारेकर आदी उपस्थित होते. गांधी अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. प्रकाश पवार यांनी प्रास्ताविक केले. मोसिम पठाण यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सुखदेव उंदरे यांनी आभार मानले.

सकाळ

# सव्वादोन लाख विद्यार्थ्यांनी घेतला
# ऑनलाईन सुविधांचा लाभ



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थी सुविधा केंद्राने विविध कागदपत्रांसाठी अर्ज करण्यासह शुल्क भरण्याची प्रक्रिया ऑनलाईन उपलब्ध केली आहे.

## शिवाजी विद्यापीठातील वर्षभरातील चित्र; वेळ, श्रम, आर्थिक बचतही

**कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील पदवी, पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना दुबार गुणतक्ता, मेरिट अथवा रँक प्रमाणपत्र, स्थलांतर दाखला (टी.सी.), ट्रान्सक्रीप्ट आदी कागदपत्रे घरबसल्या मिळविणे, प्रवेश परीक्षा देणे, पात्रता अर्ज भरणे, अभ्यासक्रम आदी सुविधा ऑनलाईन स्वरुपात शिवाजी विद्यापीठाने सुरू केल्या आहेत. त्याची व्याप्ती वर्षागणिक वाढत आहे. गेल्या वर्षात सुमारे सव्वा दोन लाख विद्यार्थ्यांनी या सुविधांचा लाभ घेतला आहे.**



बिग स्टोरी

संतोष मिठारी

### घरबसल्या अर्ज करा, कागदपत्रे मिळवा

विद्यापीठ कॅम्पसमधील अनिक्स बिल्डिंगमधून अर्ज घेतल्यानंतर शुल्क भरल्याचे चलन करण्यासाठी मुख्य इमारतीमधील रांगेत थांबा आणि परीक्षा भवन असो की, अधिविभाग त्याठिकाणी जाऊन संबंधित अर्ज जमा करा, अशी प्रक्रिया विद्यार्थ्यांना करावी लागत होती. त्यासाठी किमान एक-दोन दिवस खर्च करावे लागत होते. त्यावर विद्यार्थ्यांना लागणारी सर्व कागदपत्रे एकाच ठिकाणी देण्यासाठी विद्यापीठाने २०१३ मध्ये दूरशिक्षण केंद्राच्या इमारतीमध्ये विद्यार्थी सुविधा केंद्र सुरू केले. त्याने काही प्रमाणात विद्यार्थ्यांचा त्रास कमी झाला. या केंद्रातील कामकाजासाठी आयटीचा वापर करण्याचा विचार करून विद्यापीठाने काम सुरू केले. त्यानुसार दोन वर्षांपूर्वी येथे विविध कागदपत्रांसाठी अर्ज, शुल्क भरण्याची प्रक्रिया ऑनलाईन केली आहे.

### दुबार गुणपत्रिकापासून पदवी प्रमाणपत्रांपर्यंत सुविधा

विद्यार्थ्यांना ऑनलाईन सुविधा पुरविण्यासाठीच्या संगणक प्रणालीची निर्मिती विद्यापीठाच्या संगणक केंद्राने केली आहे. त्याच्या माध्यमातून दुबार गुणतक्ता, उत्तीर्ण प्रमाणपत्र, ट्रान्स्क्रीप्ट, चेंज इन नेम, मेरीट अथवा रँक सर्टिफिकेट, गुणतक्ता साक्षांकन, गुणतक्ता आणि कागदपत्रांची पडताळणी, विशेष प्रमाणपत्र, पदवी प्रमाणपत्र आदी कागदपत्रे मिळविण्यासाठी अर्ज आणि शुल्क भरण्याची प्रक्रिया ऑनलाईन आहे. विद्यार्थ्यांना विविध पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांची आणि पीएच.डी. अभ्यासक्रमांची प्रवेश परीक्षा, परीक्षा आणि शिष्यवृत्तीसाठी नोंदणी ऑनलाईन पद्धतीने करता येते. या ऑनलाईन सुविधांमुळे विद्यार्थ्यांना कागदपत्रे उपलब्ध होण्याची गती वाढली आहे. त्यांच्या आर्थिक खर्चातही बचत झाल्याचे विद्यार्थी सुविधा केंद्राचे उपकुलसचिव डॉ. प्रल्हाद जाखले यांनी सांगितले.

### मुख्य इमारत परिसरात हवे 'विद्यार्थी सुविधा केंद्र'

बारा वर्षांपासून विद्यार्थी सुविधा केंद्र हे दूरशिक्षण केंद्राच्या इमारतीमध्ये आहे. या केंद्राने ऑनलाईन सुविधा दिली आहे; पण अजूनही अनेक विद्यार्थी पहिल्यांदा मुख्य इमारतीमध्ये येतात. तेथून त्यांना एक ते दीड किलोमीटरची पायपीट करत विद्यार्थी सुविधा केंद्रात जावे लागते. पुन्हा परीक्षा भवन, ग्रंथालय, मुख्य इमारतीमधील एखाद्या विभागाला काही काम असल्यास जावे लागते. त्याचा विचार करून संबंधित केंद्र मुख्य इमारत अथवा परीक्षा भवन इमारतीमध्ये करावे, अशी आग्रही मागणी विद्यार्थ्यांची आहे.

### 'लर्निंग मॅनेजमेंट सिस्टीम'द्वारे ऑनलाईन अभ्यासक्रम

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाला अनुसरून विद्यापीठाने स्वत:ची 'लर्निंग मॅनेजमेंट सिस्टीम' विकसित करण्याचे काम सुरू केले आहे. त्यावर नवनवीन ऑनलाईन अभ्यासक्रम उपलब्ध करून दिले जात आहेत. दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या माध्यमातून एमबीए., एम. कॉम., एम.एस्सी. (गणित), एम.एस्सी. (कॉम्प्युटर सायन्स) अभ्यासक्रम सुरू केले आहेत. या केंद्राने बी. ए., बी. कॉम., एम. ए., एम. कॉम. च्या बदललेल्या अभ्यासक्रमानुसार एकूण २६७ विषयांचे स्वयंअध्ययन साहित्य तयार केले आहे.

### विद्यार्थी सुविधा केंद्राचा लाभ घेणारे विद्यार्थी

| कागदपत्रे | सन २०२० | २०२१ | २०२२ | २०२३ | २०२४ |
|---|---|---|---|---|---|
| दुबार गुणपत्रिका | ८४३३ | २४६४७ | १९०७२ | १३३८३ | १०७८२ |
| मीडियम ऑफ इंट्रक्शन | ९९ | ३०६ | ३८० | ३३९ | ३२१ |
| उत्तीर्ण, मेरीट, रँक प्रमाणपत्र | ११९८ | १५५४ | १७०९ | २५७५ | ११०५ |
| कागदपत्रांची पडताळणी | १७८७ | १५८५ | १७४१ | १६३८ | १९५५ |
| कागदपत्रांचे साक्षांकन | ६३१ | ४६२ | १०५ | १२५ | १२६ |
| ट्रान्सक्रीप्ट | ५९८ | ८२६ | ८८६ | ८५३ | ७३६ |
| एकूण | १२७४६ | २९३८० | २३८९३ | १८९१३ | १५०२५. |

### ऑनलाईन सुविधांचा वापर केलेले विद्यार्थी

| सुविधा | सन २०२३-२४ | २०२४-२५ |
|---|---|---|
| प्रवेश परीक्षा | १०४४२ | ९९६१ |
| विद्यार्थी नोंदणी | ७७६६२ | १२४४९१ |
| पात्रता नोंदणी | ५५५६५ | ४५६२२ |
| पीएचडी प्रवेश परीक्षा | ३०९८ | ३२२७ |
| पदवी, पदव्युत्तर, पदविका परीक्षांसाठी नोंदणी | २३०२४२ | २२४२२२ |
| पदवी प्रमाणपत्र मिळविणे | ५५५०९ | ५७००४ |
| शिष्यवृत्तीचा अर्ज भरणे | ४९५० | ३८६ (३० जानेवारीपर्यंत) |

“ विद्यार्थ्यांना लागणारी आवश्यक कागदपत्रे देण्याची प्रक्रिया ऑनलाईन केली आहे. त्याने विद्यार्थ्यांचा वेळ, श्रम, आर्थिक बचत झाली आहे. परदेशात शिक्षण, रोजगारासाठी जाणाऱ्या विद्यार्थ्यांच्या कागदपत्रांची पडताळणी वर्ल्ड एज्युकेशन सर्व्हिसेस या संस्थेच्या माध्यमातून केली जाते. ऑनलाईन सुविधा आणखी चांगल्या पद्धतीने देण्यासाठी काही तंत्रज्ञानात्मक बदल केले जाणार आहेत.

**-डॉ. अजितसिंह जाधव,**
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

“ विद्यार्थ्यांना ऑनलाईन सुविधा देण्याच्या संगणक प्रणालीची निर्मिती विद्यापीठाने स्वतः केली आहे. या सुविधांमुळे विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला आहे. आता रिव्हॅल्युएशन, टी. सी. सर्टिफिकेट आदी कागदपत्रांची पडताळणीची सुविधा, हॉस्टेल मॅनेजमेंट ऑनलाईन केले जाणार आहे. ऑनलाईन परीक्षा घेण्याची प्रणाली विकसित करण्याचे काम सध्या सुरू आहे.

**-अभिजित रेडेकर**, प्रभारी संचालक, संगणक विभाग

# शिवाजी विद्यापीठात महात्मा गांधींवरील दोन पुस्तकाचे प्रकाशन



कोल्हापूर : महात्मा गांधी यांनी चरख्याच्या माध्यमातून नागरी समाजाची प्रतिष्ठापना करण्याचा प्रयत्न केला. शेतकऱ्यांच्या स्वावलंबनासाठी आणि देशाच्या विकासासाठी गांधीजींनी अनेक प्रयोग केले.

गतीशीलता आणि स्वावलंबन हा चरख्यामागचा खरा विचार आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी आज येथे केले. शिवाजी विद्यापीठाच्या गांधी अभ्यास केंद्राद्वारे गांधी अभ्यास केंद्राचे रौप्यमहोत्सवी वर्ष व महात्मा गांधीजींच्या स्मृतिदिनानिमित्त दि. २५ जानेवारी ते १ फेब्रुवारी या कालावधीत महात्मा गांधी सप्ताह साजरा करण्यात येत आहे. या निमित्ताने आज 'चरखा' या विषयावर डॉ. लवटे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. त्याचप्रमाणे डॉ.अभय बंग लिखित 'आजचे शिक्षण आणि महात्मा गांधींचे उपाय' आणि डॉ. दशरथ पारेकर अनुवादित व संपादित 'गांधी: एक माणूस' या पुस्तकांचे प्रकाशनही झाले. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के अध्यक्षस्थानी होते.

डॉ.लवटे म्हणाले, गांधीजींनी चरखा हे आपल्या स्वराज्याचे साधन म्हणून स्वीकारले. १९०८ साली गांधीजींनी चरख्याला विचारांचे केंद्र बनविले.

त्यावेळी ते गांधीजी बॅरिस्टरीच्या अभ्यासासाठी लंडनमध्ये होते. चरख्याला गांधींनी शेतकऱ्यांचे साधन मानले. स्वातंत्र्यपूर्व काळात जिरायती शेती होत्या. केवळ सहा महिनेच शेतकऱ्यांना कामे असत. उर्वरित वेळेत शेतकऱ्यांना कामे मिळण्यासाठी मुलोद्योगाचा पर्याय गांधीजींनी चरख्याच्या माध्यमातून प्राप्त करून दिला.

प्रत्येक गोष्टीला मूल्य असते हे गांधीजींना मान्य होते. भारतीय अर्थव्यवस्था समजून घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी बारा बलुतेदार आणि अठरा आलुतेदार यांच्या जीवनाचा अभ्यास केला पाहिजे. बलुतेदार हे स्थिर व्यवसाय करीत आणि आलुतेदार फिरून व्यवसाय करीत. भारत स्वतंत्र झाल्यानंतर खादी आणि मुलोद्योगाचा विकास व्हावा, असे गांधीजींना वाटत होते.

खेड्यांचा विकास केल्याशिवाय भारताचा समृध्द विकास होणार नाही, असे त्यांचे म्हणणे होते. गांधी विचारांवर छोटे छोटे अभ्यासक्रम सुरू झाल्यास आजचा तरूण स्वावलंबी आणि उद्योजक बनेल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

'गांधी एक माणूस' या पुस्तकाविषयी बोलताना डॉ. दशरथ पारेकर म्हणाले, 'मिस्टर गांधी: अ मॅन' या पुस्तकाचे भाषांतर जरी माझ्याकडून घडलेले असले तरी, हे पुस्तक गांधीजींच्या कुटुंबामध्ये राहणाऱ्या १९०५ ते गांधी भारतात परत येईपर्यंत म्हणजे १९१५ सालापर्यंत त्यांच्यासोबत राहून त्यांच्या उपक्रमांमध्ये सहभागी झालेल्या मिली ग्रॅहम पोलाक या तरूणीने लिहिलेले आहे. मिली पोलाक खूप हुशार आणि गांधीजींना थेट प्रश्न करणाऱ्या, स्पष्टवक्त्या होत्या. गांधीजी एक सामान्य माणूस म्हणून किंवा कुटुंबाचे सदस्य म्हणून कसे होते याचे वर्णन या पुस्तकात अतिशय वेगळ्या स्वरूपात आहे, ते अन्यत्र कोठेही आलेले नाही. पोलाक ही गांधीजींची पहिली चरित्रकर्ती आणि टीकाकारही आहे. गांधीजींबरोबर एकत्र कुटुंबामध्ये जवळ-जवळ दहा ते बारा वर्षांमध्ये त्या स्त्रीचा आणि तिच्या पतीचा कालावधी गेलेला आहे. गांधीजी त्यांना आपली लहान भावंडे मानत. त्यांचे पती ग्रॅहम पोलाक गांधीजींच्या इंडियन ओपिनियन या वृत्तपत्रामध्ये मदत करीत होते. तेही वकील होते. व्यावसायिक वकीलीपेक्षा भारतीयांची वकीली त्यांनी केली. हे पुस्तक गांधीजी समजावून घेण्यासाठी अतिशय उपयुक्त आहे.

अध्यक्षीय मनोगतात कुलगुरू डॉ.दिगंबर शिर्के म्हणाले, विद्यार्थ्यांनी सर्वांगीण विकास होण्यासाठी गांधी विचारांवरील पुस्तकांचे सातत्याने वाचन, चिंतन, मनन आणि चर्चा करणे आवश्यक आहे.

याप्रसंगी, डॉ.अभय बंग लिखित 'आजचे शिक्षण आणि महात्मा गांधींचे उपाय' आणि डॉ.दशरथ पारेकर अनुवादित 'गांधी: एक माणूस' या पुस्तकांचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. गांधी अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. प्रकाश पवार यांनी प्रास्ताविक केले. मोसिम पठाण यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ.सुखदेव उंदरे यांनी आभार मानले. कार्यक्रमास ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते सुरेश शिपूरकर, नागेशकर, डॉ. श्रीराम पवार, डॉ. नंदा पारेकर यांच्यासह शिक्षक, संशोधक विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

01 FEB 2025

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संशोधन स्पर्धेत शिवाजी विद्यापीठ अव्वल

## कृषी रोबोट, धरण आपत्ती सूचना प्रणाली प्रथम; आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड



कोल्हापूर : नवी मुंबई येथे झालेल्या पश्चिम विभागीय अन्वेषण संशोधन स्पर्धेत सहभागी झालेला शिवाजी विद्यापीठाचा संघ डॉ. मानसिंगराज निंबाळकर आणि डॉ. नेहा जोशी यांच्यासमवेत.

कोल्हापूर, ता. ३१ : नवी मुंबई येथील डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठात ३० आणि ३१ जानेवारी रोजी झालेल्या 'पश्चिम विभागीय अन्वेषण संशोधन स्पर्धा २०२४-२५' मध्ये शिवाजी विद्यापीठाच्या संशोधक विद्यार्थ्यांनी कृषी व संलग्न क्षेत्रे, अभियांत्रिकी व तंत्रज्ञान या दोन गटांत प्रथम क्रमांक आणि मूलभूत विज्ञान गटात तृतीय क्रमांकांची पारितोषिके पटकविली. त्यांनी अंबाला येथे मार्चमध्ये होणाऱ्या आंतरराष्ट्रीय संशोधन स्पर्धेमध्ये स्थान मिळविले आहे.

या स्पर्धेचे पारितोषिक वितरण आज झाले. त्यात कृषी व संलग्न क्षेत्रे या गटात विघ्नेश उत्तम पाटील, ताहीर मुल्ला, दीक्षा घोसरवाडे यांनी प्रथम क्रमांक मिळविला. त्यांनी शेती व्यवस्थापनासह जनावरांची देखभाल करणारा 'कृषी रोबोट' सादर केला. अभियांत्रिकी व तंत्रज्ञान गटात शुभम गिरीगोसावी, बालाजी पाटील, रोहित गवळी यांनी प्रथम क्रमांक मिळविला. धरणाच्या भिंतीला धोका झाल्यास संभाव्य जीव व वित्तहानी टाळण्यासाठी आपत्तीची पूर्वसूचना देणाऱ्या प्रणालीचे सादरीकरण त्यांनी केले. मूलभूत विज्ञान गटात सुषमा देशमुख, अनुष्का रॉय यांनी तृतीय क्रमांक मिळविला. त्यांनी दुर्मीळ वनस्पती घटकांपासून औषध निर्मितीचा प्रकल्प सादर केला.

या विजेत्यांना भारतीय विद्यापीठ महासंघाच्या संशोधन विभागाचे संचालक डॉ. अमरेंद्र पाणी, रामराव आदिक इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचे प्राचार्य डॉ. एम.डी. पाटील यांच्या उपस्थितीत पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. स्पर्धेच्या सामाजिक विज्ञान व मानव्यशास्त्रे, आरोग्य विज्ञान व संलग्न क्षेत्रे, मूलभूत विज्ञान व उपयोजित विज्ञान, अभियांत्रिकी व तंत्रज्ञान, कृषी व संलग्न क्षेत्रे आणि आंतरविद्याशाखीय संशोधन या सहा संशोधन गटांमध्ये विद्यापीठाचा १४ जणांचा संघ सहभागी झाला. संघ व्यवस्थापक म्हणून डॉ. मानसिंगराज निंबाळकर, नेहा जोशी यांनी काम पाहिले.

संघाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, विद्यार्थी विकास विभाग संचालक डॉ. तानाजी चौगुले, आविष्कार समन्वयक डॉ. डी. एच. दगडे, पी. के. पवार, डॉ. एस. डी. जाधव यांनी अभिनंदन केले.

01 FEB 2025

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

मस्ट READ

# कृषी रोबोट, धरण आपत्ती सूचना प्रणाली ठरली प्रथम

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शेती व्यवस्थापनासह जनावरांची देखभाल करणारा 'कृषी रोबोट', धरणाच्या भिंतीला धोका झाल्यास संभाव्य जीव व वित्तहानी टाळण्यासाठी आपत्तीची पूर्वसूचना देणाऱ्या प्रणालीसाठी प्रथम, तर दुर्मीळ वनस्पती घटकांपासून औषध निर्मितीचा प्रकल्प सादर करून शिवाजी विद्यापीठाच्या संशोधक विद्यार्थ्यांनी तिसरा क्रमांक पटकावला. त्यांना अंबाला येथे मार्चमध्ये होणाऱ्या आंतरराष्ट्रीय संशोधन स्पर्धेत हे प्रकल्प सादर करण्याची संधी मिळाली आहे.

नवी मुंबईच्या डी.वाय. पाटील अभिमत विद्यापीठात ३० आणि ३१ जानेवारीला झालेल्या पश्चिम विभागीय अन्वेषण संशोधन स्पर्धेत विजेत्या विद्यार्थ्यांना भारतीय विद्यापीठ महासंघाच्या (एआययू) संशोधन विभागाचे संचालक डॉ. अमरेंद्र पाणी यांच्या हस्ते आणि रामराव आदिक इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचे प्राचार्य डॉ. एम. डी. पाटील यांच्या उपस्थितीत पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.

स्पर्धेत सामाजिक विज्ञान व मानव्यशास्त्रे, आरोग्य विज्ञान व संलग्न क्षेत्रे, मूलभूत विज्ञान व उपयोजित विज्ञान, अभियांत्रिकी व तंत्रज्ञान, कृषी व संलग्न क्षेत्रे आणि आंतरविद्याशाखीय संशोधन या सहा संशोधन गटांत विद्यापीठाचा १४ जणांचा संघ सहभागी झाला. व्यवस्थापक म्हणून विद्यापीठाच्या वनस्पतीशास्त्र अधिविभागातील डॉ. मानसिंगराज निंबाळकर आणि सांगली येथील विलिंग्डन महाविद्यालयाच्या डॉ. नेहा जोशी यांनी काम पाहिले. स्पर्धेतील विजेत्यांसह सहभागी संशोधक विद्यार्थ्यांचे कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, विद्यार्थी विकास विभाग संचालक डॉ. तानाजी चौगुले, आविष्कार समन्वयक डॉ. डी. एच. दगडे, जीवरसायनशास्त्र अधिविभागाचे डॉ. पी. के. पवार आणि विलिंग्डन महाविद्यालयाचे डॉ. एस. डी. जाधव यांनी अभिनंदन केले आहे.



नवी मुंबई येथे झालेल्या पश्चिम विभागीय अन्वेषण संशोधन स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाचा संघ डॉ. मानसिंगराज निंबाळकर आणि डॉ. नेहा जोशी यांच्यासमवेत सहभागी झाला होता.

## विजेते विद्यार्थी

कृषी व संलग्न क्षेत्रे गट : विघ्नेश उत्तम पाटील, ताहीर निसार मुल्ला, दीक्षा निवास घोसरवाडे (प्रथम)अभियांत्रिकी व तंत्रज्ञान गट : शुभम गिरीगोसावी, बालाजी प्रकाश पाटील, रोहित गणपती गवळी (प्रथम)मूलभूत विज्ञान गट : सुषमा राजीव देशमुख, अनुष्का रॉय (तृतीय)

# पश्चिम विभागीय अन्वेषण संशोधन स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाला तीन पारितोषिके






कोल्हापूर : नवी मुंबई येथील डी.वाय. पाटील अभिमत विद्यापीठात झालेल्या 'पश्चिम विभागीय अन्वेषण संशोधन स्पर्धा २०२४-२५' मध्ये शिवाजी विद्यापीठाच्या संशोधक विद्यार्थ्यांनी तीन पारितोषिके प्राप्त करून अंबाला येथे मार्चमध्ये होणाऱ्या आंतरराष्ट्रीय संशोधन स्पर्धेमध्ये स्थान प्राप्त केले आहे.

नवी मुंबईच्या डी.वाय. पाटील अभिमत विद्यापीठात ३० व ३१ जानेवारी अशी दोनदिवसीय पश्चिम विभागीय अन्वेषण संशोधन स्पर्धा २०२४-२५ पार पडली. आज या स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ झाला. त्यामध्ये कृषी व संलग्न क्षेत्रे, अभियांत्रिकी व तंत्रज्ञान या दोन गटांत शिवाजी विद्यापीठाने प्रथम क्रमांक आणि मूलभूत विज्ञान गटात तृतीय क्रमांक मिळविला

कृषी व संलग्न क्षेत्रे या गटात विघ्नेश उत्तम पाटील, ताहीर निसार मुल्ला आणि दीक्षा निवास घोलरवाडे यांनी प्रथम क्रमांक प्राप्त केला. त्यांनी शेती व्यवस्थापनासह जनावरांची देखभाल करणारा 'कृषी रोबोट' सादर केला. अभियांत्रिकी व तंत्रज्ञान गटात शुभम निरींगोसावी, बालाजी प्रकाश पाटील आणि रोहित गणपती नवळी यांनी प्रथम क्रमांक प्राप्त केला. धरणाच्या भिंतीला धोका झाल्यास संभाव्य जीव व वित्तहानी टाळण्यासाठी आपत्तीची पूर्वसूचना देणाऱ्या प्रणालीचे सादरीकरण या विद्यार्थ्यांनी केले. मूलभूत विज्ञान गटात सुषमा राजीव देशमुख व अनुष्का रॉय यांनी तृतीय क्रमांक प्राप्त केला. त्यांनी दुर्मिळ वनस्पती घटकांपासून औषध निर्मितीचा प्रकल्प सादर केला. विजेत्यांना भारतीय विद्यापीठ महासंघाच्या (ए.आय.यू.) संशोधन विभागाचे संचालक डॉ. अमरेंद्र पाणी यांच्या हस्ते आणि रामराव आदिक इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचे प्राचार्य डॉ. एम.डी. पाटील यांच्या उपस्थितीत पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. विजेत्या संशोधकांना त्यांचे प्रकल्प आता मार्चमध्ये अंबाला येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय संशोधन स्पर्धेत सादर करण्याची संधी प्राप्त झाली आहे.

स्पर्धेच्या सामाजिक विज्ञान व मानव्यशास्त्रे, आरोग्य विज्ञान व संलग्न क्षेत्रे, मूलभूत विज्ञान व उपयोजित विज्ञान, अभियांत्रिकी व तंत्रज्ञान, कृषी व संलग्न क्षेत्रे आणि आंतरविद्याशाखीय संशोधन या सहा संशोधन गटांमध्ये विद्यापीठाचा १४ जणांचा संघ सहभागी झाला. संघ व्यवस्थापक म्हणून विद्यापीठाच्या वनस्पतीशास्त्र अधिविभागातील डॉ. मानसिंगराज निंबाळकर आणि सांगली येथील विलिंग्डन महाविद्यालयाच्या डॉ. नेहा जोशी यांनी काम पाहिले.

स्पर्धेतील विजेत्यांसह सहभागी संशोधक विद्यार्थ्यांचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, विद्यार्थी विकास विभाग संचालक डॉ. तानाजी चौगुले यांच्यासह आविष्कार समन्वयक डॉ. डी. एच. दगडे, जीवरसायनशास्त्र अधिविभागाचे डॉ. पी. के. पवार आणि विलिंग्डन महाविद्यालयाचे डॉ. एस. डी. जाधव यांनी अभिनंदन केले आहे.

याप्रमाणे कार्यवाही केल्यानंतरच नौकांच्या मासेमारी परवान्यांचे नुतनीकरण व मासेमारी टोकन निर्गमित करण्यात येणार आहेत. तसेच या कार्यवाही न करणाऱ्या नौकांच्या मालकांवर महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम १९८१(सुधारीत २०२१) अंतर्गत मासेमारी परवाना अटी - शर्ती भंग म्हणून मासेमारी परवाना रद्द करून योग्य ती कार्यवाही करण्यात येणार असल्याची माहिती, आयुक्त श्री.तावडे यांनी दिली.

01 FEB 2025
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘एआय’सह आधुनिक तंत्रज्ञानाचा ग्रंथालयात वापर करावा

## डॉ. विनायक बंकापुरे : शिवाजी विद्यापीठात टेक्नो लायब्ररीयनशिप राष्ट्रीय परिषद उत्साहात

**कोल्हापूर :** ग्रंथपालांनी शिक्षणाबरोबरच नवनवीन कौशल्य आत्मसात करावीत. तसेच ‘एआय’सह आधुनिक तंत्रज्ञानाचा ग्रंथालयात वापर करावा, असे आवाहन राणी चन्नम्मा युनिव्हर्सिटी बेळगावमधील ग्रंथालय माहितीशास्त्र विषयाचे प्राध्यापक डॉ. विनायक बंकापुरे यांनी केले. शिवाजी विद्यापीठातील बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्त्रोत केंद्र, ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभाग व शिवाजी विद्यापीठ कॉलेज लायब्ररीयन असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने ‘टेक्नो लायब्ररीयनशिप : अ गेटवे टूवर्डस् फ्युचर लायब्ररीज’ विषयावर विद्यापीठात राष्ट्रीय परिषद झाली. त्यात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

डॉ. बंकापुरे म्हणाले, ग्रंथालयात नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर अपरिहार्य झाला आहे. तंत्रज्ञानाच्या माध्यमातून दर्जेदार सेवा वाचकांना देता येतात. अध्यक्षीय मनोगतामध्ये प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, ग्रंथपालांनी सर्व स्तरांतील लोकांपर्यंत ग्रंथालयीन सेवा पोहोचवल्या पाहिजेत. ग्रंथपालांनी स्वतः माहितीचे स्त्रोत व्हावे.



**कोल्हापूर : बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्त्रोत केंद्र व शिवाजी विद्यापीठ कॉलेज लायब्ररीयन असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी मान्यवर.**

प्रास्ताविकामध्ये बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्त्रोत केंद्राचे संचालक डॉ. डी. बी. सुतार म्हणाले, पाच ग्रंथपालांनी पेटंट घेतलेली आहेत. नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर ग्रंथापालन व्यवसायात सुरू आहे. त्याद्वारे दर्जेदार सेवा दिल्या जात आहेत. हे तंत्रज्ञान सर्व ग्रंथालयांपर्यंत पोहोचले पाहिजे. यावेळी पेटंट मिळवलेल्या पाच ग्रंथपालांचा सत्कार करण्यात आला.

दुसऱ्या सत्रात टाटा कन्सल्टिंग सर्व्हिसेसचे संचालक किशोर इंगळे यांनी मार्गदर्शन केले. ग्रंथपाल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. आर. पी. आडाव यांनी आभार मानले. सुधाराणी हजारे यांनी सूत्रसंचालन केले. ग्रंथालय माहितीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. सचिनकुमार पाटील यांनी प्रमुख पाहुण्यांची ओळख करून दिली. उपग्रंथपाल डॉ. पी. बी. बिलावर, डॉ. वाय. जी. जाधव, डॉ. बालाजी कांबळे, डॉ. एस. व्ही. थोरात, डॉ. तानाजी कांबळे, डॉ. अतुल नगरकर, डॉ. कैलास पवार, डॉ. पांडुरंग पाटील, विश्वास हसे, रवी मांगले, भावेश पटेल, सागर लोंढे, डॉ. उर्मिला कदम आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 FEB 2025
लोकमत

# ग्रंथालयांनी नवतंत्रज्ञान अंगीकारण्याची गरज

## विनायक बंकापूर : विद्यापीठात राष्ट्रीय परिषद

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** बदलत्या तंत्रज्ञानाच्या गतीने बदलण्याचे आव्हान आज सर्वच क्षेत्रांसमोर आहे. ग्रंथालयांनीही नवतंत्रज्ञान अंगीकारण्याची गरज आहे, असे प्रतिपादन बेळगावच्या राणी चन्नम्मा विद्यापीठाचे डॉ. विनायक बंकापूर यांनी बुधवारी केले.

शिवाजी विद्यापीठाचे बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्र, ग्रंथालय, माहितीशास्त्र विभाग व शिवाजी विद्यापीठ महाविद्यालयीन ग्रंथालय संघटना (सुक्ला) यांच्यावतीने 'टेक्नोलाइब्ररियनशिप : अ गेटवे टूवर्ड्स फ्युचर लायब्ररीज्' या विषयावर एकदिवसीय राष्ट्रीय परिषदेत ते बोलत होते. राजर्षी शाहू सभागृहात झालेल्या या परिषदेत प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील अध्यक्षस्थानी होते.

डॉ. बंकापूर यांनी आपल्या भाषणात मातीच्या विटेतील अक्षरांपासून डिजिटल अक्षरांपर्यंतचा तंत्रज्ञानाचा प्रवास कसा घडला, अफाट माहिती प्रस्फोट युगात डिजिटल ग्रंथालये, ग्रंथपाल यांचे महत्त्व याविषयी विवेचन केले. डॉ. प्रमोद पाटील म्हणाले, आर्टिफिशियल इंटेलिजन्समधील जनरेटिव्ह एआय, क्वांटम एआय, चीनचे अतिअद्ययावत डीपसिक एआय तंत्रज्ञान, इलेक्ट्रॉन-ह्युमन न्यूरॉन यातून विकसित न्यूरोचीप असा तंत्रज्ञानाचा आवाका गतीने वाढतो आहे. तंत्रज्ञानाची ही झेप ओळखून आपणही त्याच्याशी सुसंगत राहण्याची आवश्यकता आहे. परिषदेत देशभरातील ६८ ग्रंथालय तज्ज्ञांसह ग्रंथालय प्रोफेशनल्स, शिक्षक, संशोधक विद्यार्थी सहभागी झाले. ५४ संशोधकांनी शोधनिबंध सादर केले. डॉ. धनंजय सुतार यांनी स्वागत केले. डॉ. सचिनकुमार पाटील यांनी ओळख करुन दिली.

**५४**
संशोधकांचे शोधनिबंध सादर

01 FEB 2025
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# ग्रंथालयांनी नवतंत्रज्ञान अंगिकारण्याची गरज

## डॉ. विनायक बंकापूर : शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय परिषद

कोल्हापूर, ता. ३१ : 'बदलत्या तंत्रज्ञानाच्या गतीने बदलण्याचे आव्हान आज सर्वच क्षेत्रांसमोर आहे. ग्रंथालयांनीही नवतंत्रज्ञान अंगिकारण्याची गरज आहे', असे प्रतिपादन बेळगावच्या राणी चन्नम्मा विद्यापीठाचे डॉ. विनायक बंकापूर यांनी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाचे बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्र, ग्रंथालय व माहितीशास्त्र विभाग आणि शिवाजी विद्यापीठ महाविद्यालयीन ग्रंथालय संघटनेतर्फे (सुक्ला) 'टेक्नोलाइब्ररियनशिप: अ गेटवे टूवर्ड्स फ्युचर लायब्ररीज्' या विषयावर आयोजित केलेल्या राष्ट्रीय परिषदेमध्ये ते बोलत होते. राजर्षी शाहू सभागृहातील या परिषदेच्या अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील होते.

डॉ. बंकापूर यांनी मातीच्या विटेतील अक्षरांपासून डिजिटल अक्षरांपर्यंतचा तंत्रज्ञानाचा प्रवास कसा घडला, अफाट माहिती प्रस्फोट युगात डिजिटल ग्रंथालये, ग्रंथपाल यांचे महत्त्व सांगितले. तर, आर्टिफिशियल इंटेलिजन्समधील जनरेटिव्ह एआय,



डॉ. बंकापूर

क्वांटम एआय, चीनचे अतिअद्यावत डीपसीक एआय तंत्रज्ञान, इलेक्ट्रॉन-ह्युमन न्युरॉन यातून विकसित न्युरोचीप असा तंत्रज्ञानाचा आवाका गतीने वाढतो आहे. तंत्रज्ञानाची ही झेप ओळखून आपणही त्याच्याशी सुसंगत राहण्याची आवश्यकता असल्याचे प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांनी सांगितले. टाटा कन्सल्टन्सीचे किशोर इंगळे यांनी लायब्ररीयन कौशल्य, लायब्ररी एज्युकेशनचे डिजिटल युगातील महत्त्व अधोरेखित केले.

या परिषदेत देशभरातील ६८ ग्रंथालय तज्ज्ञांसह ग्रंथालय प्रोफेशनल्स, शिक्षक, संशोधक विद्यार्थी सहभागी झाले. ५४ संशोधकांनी शोधनिबंध सादर केले. ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक डॉ. धनंजय सुतार यांनी स्वागत केले. विभागप्रमुख डॉ. सचिनकुमार पाटील यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. 'सुक्ला'चे अध्यक्ष डॉ. रवींद्र आढाव यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 FEB 2025

सकाळ

# स्त्री-भ्रूणहत्या रोखण्यात महिलांची भूमिका महत्त्वाची

## डॉ. विलास शिंदे : 'बेटी बचाओ' अभियान

कोल्हापूर, ता. ३१ : 'स्त्री-भ्रूणहत्या रोखण्यामध्ये महिलांची भूमिका फार महत्त्वाची आहे. सामाजिक संतुलनासाठी स्त्री-पुरुष गुणोत्तर जपणे आणि कोणत्याही मुलीची गर्भातच हत्या होऊ न देणे यासाठी प्रत्येक नागरिकाने आपापल्या स्तरावर दक्षता घेतली पाहिजे, असे मत शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी व्यक्त केले.

विद्यापीठाच्या 'बेटी बचाओ अभियान' आणि विद्यार्थी विकास विभाग यांच्यातर्फे विद्यापीठातील अधिविभाग आणि संलग्नित महाविद्यालयांतील शिक्षक आणि विद्यार्थ्यांकरिता 'राष्ट्रीय बालिका दिना'निमित्त वैद्यकीय गर्भपात कायदा आणि पोक्सो कायदा या अनुषंगाने जागृती करण्यासाठी कार्यशाळा घेण्यात आली. त्यावेळी ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते.

समाजशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. प्रतिमा पवार म्हणाल्या, 'कौटुंबिक स्तरावर मुलांचे संगोपन करीत असताना त्यांच्यात मुलगा-मुलगी असा कोणत्याही प्रकारच्या भेदभावाला स्थान देता कामा नये.' विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. तानाजी चौगले यांनी मनोगत व्यक्त केले. अॅड. गौरी पाटील यांनी वैद्यकीय गर्भपात कायद्याविषयी, तर समाजसेविका गौरी हसूरकर यांनी पोक्सो कायद्याविषयी माहिती दिली. बेटी बचाओ अभियानाच्या समन्वयक डॉ. प्रतिभा देसाई यांनी प्रास्ताविक केले. सुप्रिया वडर, योगेश कर्चे यांनी सूत्रसंचालन केले. आकाश ब्राम्हणे, डॉ. योजना पाटील यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 FEB 2025
तरुण भारत

# विद्यापीठात 'शोध होळकरशाही'चा विषयावर सोमवारी चर्चासत्र

**कोल्हापूर :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती महोत्सवीवर्षाचे औचित्य साधून शिवाजी विद्यापीठाच्या अहिल्यादेवी होळकर अध्यासन केंद्राच्या वतीने 'शोध होळकरशाहीचा' विषयावर एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन केले आहे. सोमवार ३ रोजी सकाळी १०.३० ते ५.०० या वेळेत विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागाच्या सभागृहात चर्चासत्र होणार आहे. यात ज्येष्ठ लेखिका विनया खडपेकर यांचे बीजभाषण असून कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के अध्यक्षस्थानी आहेत. चर्चासत्रामध्ये डॉ. देवीदास पोटे, डॉ. प्रभाकर कोळेकर, सुमितराव लोखंडे, विनिता तेलंग, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. संतोष पिंगळे, डॉ. अवनीश पाटील, रामभाऊ लांडे, डॉ. नीलेश शेळके यांचे मार्गदर्शन होणार आहे. यासाठी उपस्थित रहावे, असे आवाहन अध्यासनाचे समन्वयक डॉ. मच्छिंद्र गोफणे आणि कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 FEB 2025
सकाळ

# 'शोध होळकरशाहीचा'वर सोमवारी चर्चासत्र

कोल्हापूर : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती महोत्सवी वर्षानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या अहिल्यादेवी होळकर अध्यासन केंद्रातर्फे 'शोध होळकरशाहीचा' या विषयावर सोमवारी (ता. ३) सकाळी साडेदहा वाजता राष्ट्रीय चर्चासत्र होणार आहे. विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागाच्या सभागृहातील या चर्चासत्रात ज्येष्ठ लेखिका विनया खडपेकर यांचे बीजभाषण होणार असून, अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के असतील. चर्चासत्रामध्ये डॉ. देवीदास पोटे, प्रभाकर कोळेकर, सुमितराव लोखंडे, विनिता तेलंग, रणधीर शिंदे, संतोष पिंगळे, अवनीश पाटील, रामभाऊ लांडे, नीलेश शेळके सहभागी होणार आहेत, अशी माहिती अध्यासनाचे समन्वयक डॉ. मच्छिंद्र गोफणे यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 FEB 2025
पुण्यनगरी

# विद्यापीठामध्ये ३ रोजी शिल्पकला कार्यशाळा

**कोल्हापूर :** शिल्पमहर्षी शिल्पकार बी. आर. खेडकर यांच्या जन्मशताब्दीनिमित्त शिवाजी विद्यापीठात दि. ३ फेब्रुवारी रोजी शिल्पकला कार्यशाळेचे आयोजन केले आहे. शिवाजी विद्यापीठाचा संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग आणि शिल्पसम्राट कला स्टुडिओ यांच्या संयुक्त विद्यमाने 'शिल्पकला कार्यशाळा-२०२५' आयोजित केली आहे. कार्यशाळेत खेडकर यांच्या कन्या शिल्पकार सीमा खेडकर-शिर्के आणि शिल्पकार संजीव संकपाळ हे प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन करणार आहेत. दि. ३ रोजी सकाळी १० ते ४ या वेळेत विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्रासमोरील उद्यानात कार्यशाळा होईल. इच्छुकांनी १ फेब्रुवारीपर्यंत नावनोंदणी करणे आवश्यक आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 FEB 2025
तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठात ई-कंटेंट कार्यशाळा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र व एम. ए. मास कम्युनिकेशन यांच्या संयुक्त विद्यमाने पीएम उषा अंतर्गत 'डिझाईन अँड डेव्हलपमेंट ऑफ ई-कंटेन्ट फॉर ऑनलाईन लर्निंग अँड मूक्स' विषयावर दोन दिवसीय




कार्यशाळेचा समारोप झाला. व्हिडीओ एडिटर अक्षय दळवी यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे उपकुलसचिव व्ही. बी. शिंदे होते. दळवी यांनी ऍडोब प्रीमियर-प्रो या व्हिडिओ एडिटिंग सॉफ्टवेअर वापराबद्दलची माहिती दिली. यातील इफेक्ट कंट्रोल, प्रोजेक्ट प्लॅनर, टाईमलाईन पॅनेल या टूल्सबरोबरच विविध एडिटिंग इफेक्ट्सची माहिती प्रात्यक्षिकाद्वारे दिली. तंत्रज्ञ मल्हार जोशी यांनी कॅमेरा, लाईट्स, स्टुडिओ, माईक, क्रोमा याचे महत्व समजावून सांगितले. मास कम्युनिकेशन विभागाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी स्वागत केले. पाहुण्यांची ओळख डॉ. सुमेधा साळुंखे यांनी करून दिली. जयप्रकाश पाटील यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. नितीन रणदिवे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 FEB 2025
लोकमत

# ई - कंटेंट फॉर ऑनलाइनचा समारोप

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात दूरशिक्षण व ऑनलाइन शिक्षण केंद्र व एम.ए. मास कम्युनिकेशन यांच्यावतीने 'डिझाइन अँड डेव्हलपमेंट ऑफ ई-कंटेन्ट फॉर ऑनलाइन लर्निंग अँड मूक्स' या विषयावर दोन दिवसीय कार्यशाळेचा गुरुवारी समारोप झाला. व्हिडीओ एडिटर अक्षय दळवी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी उपकुलसचिव व्ही. बी. शिंदे अध्यक्षस्थानी होते.

दळवी यांनी ॲडॉब प्रीमियर-प्रो या व्हिडिओ एडिटिंग सॉफ्टवेअर वापराबद्दलची माहिती दिली. यातील इफेक्ट कंट्रोल, प्रोजेक्ट प्लॅनर, टाइमलाइन पॅनेल या टूल्सबरोबरच विविध एडिटिंग इफेक्ट्सची माहिती प्रात्यक्षिकाद्वारे दिली. तसेच हे सॉफ्टवेअर शिक्षक व विद्यार्थ्यांना हाताळायला देऊन त्यांच्या शंकांचे निरसन केले. डॉ. शिवाजी जाधव यांनी स्वागत केले. डॉ. सुमेधा साळुंखे यांनी परिचय करून दिला. जयप्रकाश पाटील यांनी सूत्रसंचालन केले तर डॉ. नितीन रणदिवे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 FEB 2025
सकाळ

# विद्यापीठात ई- कंटेंट कार्यशाळेचा समारोप

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र व एम. ए. मास कम्युनिकेशनतर्फे आयोजित 'डिझाईन अँड डेव्हलपमेंट ऑफ इ- कंटेंट फॉर ऑनलाईन लर्निंग अँड मूक्स' या विषयावरील दोन दिवसीय कार्यशाळेचा समारोप झाला. अध्यक्षस्थानी उपकुलसचिव व्ही. बी. शिंदे होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून व्हिडिओ एडिटर अक्षय दळवी यांनी अ‍ॅडॉब प्रीमियर-प्रो या व्हिडिओ एडिटिंग सॉफ्टवेअर वापराबद्दलची माहिती दिली. तंत्रज्ञ मल्हार जोशी यांनी कॅमेरा, लाईट्स, स्टुडिओ, माईक, क्रोमा याचे महत्त्व समजावून सांगितले. डॉ. शिवाजी जाधव यांनी प्रास्ताविक केले. डॉ. सुमेधा साळुंखे यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. जयप्रकाश पाटील यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. नितीन रणदिवे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 FEB 2025
पुढारी

# 'ज्येष्ठ पत्रकार नाना पालकर यांची पत्रकारिता' विषयावर आज विद्यापीठात कार्यक्रम

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

प्रेस कौन्सिल ऑफ इंडियाचे माजी सदस्य दिवंगत ज्येष्ठ पत्रकार नाना पालकर यांची पत्रकारिता आणि आठवणी या विषयावर ज्येष्ठ पत्रकार नंदकुमार ओतारी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. शिवाजी विद्यापीठाच्या मास कम्युनिकेशन विभागामध्ये शनिवारी (दि. १) दुपारी ३ वाजता कार्यक्रम होणार आहे. पालकर यांच्या पत्रकारितेची माहिती व्हावी या उद्देशाने कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. कार्यक्रम सर्वांसाठी खुला असून पत्रकारांनी उपस्थित राहावे, असे आवाहन डॉ. शिवाजी जाधव यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 FEB 2025
पुढारी

# शिवाजी विद्यापीठाकडून ४७९ परीक्षांचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील आजअखेर ४७९ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले आहेत. विद्यापीठ संलग्न महाविद्यालयात सध्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरू आहेत. शुक्रवारी एमए (अर्थशास्त्र), लॉ तीन वर्षे व पाच वर्षे आदी ३२ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले आहेत. विद्यापीठाने परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत. परीक्षेचे पावित्र्य राखण्यासाठी विद्यार्थ्यांनी दिलेल्या सूचनांप्रमाणेच परीक्षा द्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

01 FEB 2025

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# रग्बी : शिवाजी विद्यापीठाला सुवर्णपदक

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

भुवनेश्वर (ओडिशा) येथे झालेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ रग्बी स्पर्धेमध्ये कोल्हापुरातील शिवाजी विद्यापीठाच्या महिला संघाने सेव्हन-ए-साईड प्रकारात सलग दुसऱ्या वर्षी सुवर्ण पदक पटकाविले. १५-ए-साईड प्रकारात कांस्य पदकाची कमाई केली. सुवर्णपदक विजेत्या संघाचा गौरव राज्यसभेचे खासदार अच्युत सामंत यांच्या हस्ते झाला.

स्पर्धेच्या उपउपांत्य फेरीत शिवाजी विद्यापीठाने पंजाबी युन्हिर्सिटीचा ४८-०, उपांत्य फेरीत मुंबई विद्यापीठचा ३४-० असा पराभव करून अंतिम फेरीत केआयआयटी युनिव्हर्सिटीचा १५-५ असा पराभव करून विजेतेपद पटकाविले. सुवर्ण पदक विजेत्या संघात वैष्णवी पाटील, कल्याणी पाटील, शुभांगी गावडे, साक्षी कुंभार, पूनम पाटील, प्राची पारखे, पूजा कुंभार, ऋतुजा किर्दत, आकांक्षा कातकडे, सायली पाटील, स्वाती माळी, नेहा पाटील यांचा समावेश आहे.

१५-ए-साईड प्रकारात शिवाजी विद्यापीठाच्या संघाने कांस्य पदकाची कमाई केली. या संघात प्राची पताडे, सानिका पाटील, अनुष्का संकपाळ, मधुरा शिनगारे, समृद्धी कदम, कु. वैष्णवी पाटील, कल्याणी पाटील, शुभांगी गावडे, साक्षी कुंभार, पूनम पाटील, प्राची पारखे, पूजा कुंभार, ऋतुजा किर्दत, आकांक्षा कातकडे, सायली पाटील, स्वाती माळी, नेहा पाटील, मयुरी कदम, पूजा लाड, दृष्टी पटेल, श्वेता चिकोडी, तृप्ती गुरव, वसुधा माळी, सोनाली मगदूम, सानिका चौगले, शिवानी वाघमारे, लवटे सोनम यांचा समावेश होता. संघाला प्रशिक्षक दीपक पाटील, सहायक प्रशिक्षक प्रा. राहुल लहाने, संघ व्यवस्थापक प्रा. सुहास वाघ यांच्यासह कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, अमर सासणे यांचे मार्गदर्शन लाभले.




**कोल्हापूर : भुवनेश्वर (ओडिशा) येथे झालेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ रग्बी स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठ महिला संघाने सलग दुसऱ्या वर्षी सुवर्णपदक पटकाविले.**

01 FEB 2025

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अभ्यासिकेतून यशाला गवसणी

## ‘कौशल्य विकास’चा उपक्रम : अनेक विद्यार्थी विविध पदांवर कार्यरत

**प्रवीण देसाई : सकाळ वृत्तसेवा**

**कोल्हापूर, ता. ३१ : स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करणाऱ्या परीक्षार्थींना जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विकास मार्गदर्शन केंद्राची ‘ग्रंथालयसदृशय अभ्यासिका’ मोलाची साथ देत आहे. या अभ्यासिकेतून यशाला गवसणी घालत १५ हून अधिक जण विविध पदांवर कार्यरत झाले आहेत. त्यांच्या यशात या अभ्यासिकेने मोलाची कामगिरी बजावली आहे. आताही या ठिकाणी अनेक विद्यार्थी अभ्यास करत आहेत.**

ही अभ्यासिका तत्कालीन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शक केंद्राचे सहायक आयुक्त संजय माळी यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. विचारे माळ येथील शासकिय निवासस्थान येथे ही अभ्यासिका आहे. एका खोलीत पुस्तके तर दुसऱ्या खोलीत विद्यार्थ्यांना बसण्याची व्यवस्था आहे. त्यांना पिण्याची पाण्याचीही सुविधा करण्यात आली आहे. अभ्यासिकेत एमपीएससी', 'यूपीएससी' व इतर स्पर्धा परीक्षेसाठी विविध प्रकारची पुस्तके ठेवण्यात आली आहेत. जवळपास एक हजारांहून अधिक पुस्तकांचा संग्रह येथे आहे. दररोज कार्यालयीन वेळेत सकाळी दहा ते सायंकाळी साडेपाच या वेळेत ही अभ्यासिका सुरू असते. येथे विद्यार्थ्यांना आवश्यक असणारी पुस्तके उपलब्ध असल्याने त्यांची चांगली सुविधा झाली आहे. दररोज असंख्य विद्यार्थी या ठिकाणी अभ्यासाला येत असतात. येथे देखभालीसाठी एक कर्मचारी कार्यरत असतो. विद्यार्थ्यांकडून अभ्यासिकेत प्रवेश घेण्यापूर्वी अर्जासोबत आधार कार्डची झेरॉक्स व एक फोटो घेऊन त्यांची नोंद केली जाते.

### अभ्यासिकेतून घडले पोलिस उपनिरीक्षक, सी.ए.

**या अभ्यासिकेत अभ्यास करून आतापर्यंत चार पोलिस उपनिरीक्षक, एक सी.ए., दोन शिक्षक, एक वनरक्षक, एक नायब तहसीलदार, सात पोलिस कॉन्स्टेबल यांचे भवितव्य घडले आहे. त्यांच्या यशात या अभ्यासिकेने मोलाची भूमिका बजावली आहे. इथून पुढेही अशाच पद्धतीने असे माणिक मोती घडविण्यात ती मागे राहणार नाही निश्चित आहे.**

“ ‘स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ही अभ्यासिका महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहे. येथे अभ्यास करणाऱ्यांपैकी अनेकांची विविध पदांवर वर्णी लागली आहे. विद्यार्थ्यांकडून कोणत्याही प्रकारची फी घेतली जात नाही. त्यामुळे निश्चित या अभ्यासिकेचा सर्वसामान्य विद्यार्थ्यांना चांगला लाभ होत आहे.

**- कपिल माने**, परीक्षार्थी